५/१

RNI No. MAHBIL/2009/31748

Reg. No. MH/MR/South-324/2010-12

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग एक-अ—मध्य उप-विभाग

वर्ष ४, अंक ३९ ] सोमवार, ऑगस्ट ६, २०१२/श्रावण १५, शके १९३४ [पृष्ठे ४, किंमत : रुपये २०.००

असाधारण क्रमांक १०७

## प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.

## नगरविकास विभाग

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ६ ऑगस्ट २०१२.

### अधिसूचना

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९.

क्रमांक स्थासंक. ०२०९/प्र.क्र. ६५/०९/न.वि. ३४.–मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई ५९) याच्या कलम १५२-न च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे पुढील नियम, सदर नियमास १५२-न च्या पोट-कलम (२) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे प्रसिद्धी देऊन करीत आहे, ते असे :—

१. संक्षिप्त नाव.— या नियमांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) (सुधारणा) नियम, २०१२ असे म्हणावे.

२. मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम, २०१० (यापुढे सदर नियम हा " प्रधान नियम " म्हणून उल्लेखित करण्यात येईल) च्या नियम-२७ मधील,—

(अ) उप नियम (१) मध्ये " रुपये पाच लाखांपेक्षा " या मजकुराऐवजी " रुपये दहा लाखांपेक्षा " हा मजकूर, आणि

(ब) उप नियम (२) मध्ये " पाच लाख रुपयांपेक्षा " या मजकुराऐवजी " दहा लाख रुपयांपेक्षा " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(क) उप नियम (३) खालील तक्त्याऐवजी पुढील तक्ता दाखल करण्यात येईल.–

| अ.क्र. | वर्षभरातील सर्व खरेदीची उलाढाल | दर वर्षी प्रदेय असलेला स्थानिक संस्था कर (रुपये) |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | रु. १,००,००० पर्यंत | काही नाही |
| २ | रु. १,००,००० पेक्षा अधिक परंतु, रु. २,००,००० पेक्षा अधिक नसेल | ४,००० |
| ३ | रु. २,००,००० पेक्षा अधिक परंतु, रु. ३,००,००० पेक्षा अधिक नसेल | ६,००० |
| ४ | रु. ३,००,००० पेक्षा अधिक परंतु, रु. ४,००,००० पेक्षा अधिक नसेल | ८,००० |
| ५ | रु. ४,००,००० पेक्षा अधिक परंतु, रु. ५,००,००० पेक्षा अधिक नसेल | १०,००० |
| ६ | रु. ५,००,००० पेक्षा अधिक परंतु, रु. ६,००,००० पेक्षा अधिक नसेल | १२,००० |
| ७ | रु. ६,००,००० पेक्षा अधिक परंतु, रु. ७,००,००० पेक्षा अधिक नसेल | १४,००० |
| ८ | रु. ७,००,००० पेक्षा अधिक परंतु, रु. ८,००,००० पेक्षा अधिक नसेल | १६,००० |
| ९ | रु. ८,००,००० पेक्षा अधिक परंतु, रु. ९,००,००० पेक्षा अधिक नसेल | १८,००० |
| १० | रु. ९,००,००० पेक्षा अधिक परंतु, रु. १०,००,००० पेक्षा अधिक नसेल | २०,००० |

(ड) उप नियम (३) नंतर खालील नवीन नियम समाविष्ट करण्यात येइल,-

"(४) महानगरपलिकेच्या हद्दीद बांधकाम करण्याचे काम हाती घेणारा कोणताही बांधकाम व्यावसायिक/कंत्राटदार, स्थानिक संस्था कर याखाली महानगरपालिकेकडे स्वत:ची नोंदणी करील आणि त्याला, शहराच्या हद्दीत बांधकामाकरिता किंवा वापराकरिता आयात केलेल्या मालाच्या किंमतीवर एकतर स्थानिक संस्था कर प्रदान करण्याचा पर्याय असेल किंवा खालील मानकांनुसार स्थानिक संस्था कराचे ठोक प्रदान करण्याचा पर्याय असेल–

(क) चौथ्या मजल्यापर्यंतचे बांधकाम (ज्या इमारतीत उद्वाहन नसेल तेथे)–रुपये १०० रुपये शंभर प्रती चौ. मी.

(ख) सातव्या मजल्यापर्यंतचे बांधकाम (ज्या इमारतीत उद्वाहन असेल तेथे)–रुपये १५० रुपये दिडशे प्रती चौ. मी.

(ग) उत्तुंग इमारतींचे बांधकाम (सात मजल्यांपेक्षा अधिक)–रुपये २०० रुपये दोनशे प्रती चौ. मी.

जो कंत्राटदार ठोक कर प्रदानाचा पर्याय स्वीकारेल तो प्रारंभ प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केल्यावर स्थानिक संस्था कराच्या अशा देय रकमेपैकी ५०% आगाऊ रकमेचे प्रदान करु शकेल.

(५) महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये काम हाती घेतलेल्या कंत्राटदाराने प्रदान करावयाची ठोक रक्कम–

महानगरपालिकेच्या क्षेत्रात कोणतेही काम हाती घेणाऱ्या कोणत्याही व्यापाऱ्याला किंवा व्यक्तीला, अशी कामे हाती घेण्यासाठी शहराच्या हद्दीत आयात केलेल्या मालाच्या किंमतीवर एकतर स्थानिक संस्था कर प्रदान करण्याचा किंवा त्याच्या कंत्राट मूल्यांच्या एकूण रकमेच्या ०.२५% इतक्या ठोक दराने उक्त कर प्रदान करण्याचा पर्याय असेल.

(३) प्रधान नियमातील नियम ३२ हा उप नियम (१) म्हणून पुन:क्रमांकित करण्यात येईल. अशा प्रकारे पुन:क्रमांकित करण्यात आलेल्या उप नियम (१) नंतर खालील उप नियम समावष्ट करण्यात येतील :–

२(क) जेथे व्यापाऱ्याने किंवा व्यक्तीने आयुक्तांच्या पूर्व परवानगीशिवाय परताव्याच्या रकमेचे समायोजन केल्यानंतर कराची रक्कम प्रदान केली असल्यास, अशी प्रकरणे नियमित निर्धारणाकरिता प्राथम्याने हाती घेण्यात येतील.

(ख) अशा निर्धारणानंतर व्यापाऱ्याने किंवा व्यक्तीने ती ज्या रकमेचा परतावा मिळण्यास पात्र होती त्या रकमेपेक्षा अधिक रकमेच्या परताव्याचा दावा केला असल्याचे आढळून आले असेल तर, अशा फरकाच्या रकमेवर देय आढळून आलेल्या अशा फरकाच्या रकमेच्या पाचपट दंड आकारण्यात येईल.

(ग) व्यापाऱ्याने किंवा व्यक्तीने प्रपत्र (अय) मध्ये केलेल्या दाव्यानुसार तो परताव्यास पात्र ठरत असेल तेथे आयुक्त असा अर्ज मिळाल्यापासून एक महिन्याच्या आत प्राथम्यक्रमाने निर्धारण करील आणि दाव्याबाबत निर्णय घेईल. असा अर्ज दाखल केल्याच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या आत परताव्याच्या दाव्यावर निर्णय घेण्यास आयुक्त कसूर करील तर, प्रदानाच्या दिनांकापर्यंत देय होईल अशा परताव्यावर ६% दराने व्याज मिळण्यास व्यापारी किंवा व्यक्ती पात्र असेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

गो. आ. लोखंडे,
शासनाचे उप सचिव.